वर्ष- १२ | अंक- ३२ | मुंबई, मंगळवार,२३ जुन २०२६ ते २९ जुन २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

भारतीय अर्थव्यवस्थेसमोर संकट घोंघावत असल्याच्या मुद्द्यावर अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडेंचे विश्लेषण

3 → गडकरींची मुंबई-गोवा महामार्गावरील महाथाप!

मिरा -भाईंदर पोलिसांचा उत्तर प्रदेशातील एमडी ड्रग्ज कारखान्यावर छापा ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

ठाण्यातील 'लाऊड ९ लाऊंज'वर हुक्का साहित्य जप्त, चालकासह १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

'लाऊड ९ लाऊंज' येथे ग्राहकांना हुक्का सेवा पुरविली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, ठाणे बाळासाहेब पाटील यांना मिळाली होती

ठाणे। ठाण्यातील राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या उथळसर प्रभाग समितीजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवरील 'लाऊड ९ लाऊंज' या आस्थापनावर पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकून बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या हुक्का पार्लरचा पदार्फाश केला. या कारवाईत हुक्का पॉट व विविध फ्लेवरसह सुमारे ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, हॉटेल चालकासह एकूण १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जून रोजी रात्री सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास उथळसर परिसरातील 'लाऊड ९ लाऊंज' येथे ग्राहकांना हुक्का सेवा पुरविली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, ठाणे बाळासाहेब पाटील यांना मिळाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईचे निर्देश दिले.

या सूचनेनुसार मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने



कारवाईची आखणी केली. त्यानंतर १५ जून रोजी पहाटे सुमारे १२.३५ वाजता पोलिसांचे पथक 'लाऊड ९ लाऊंज' येथे दाखल झाले. अचानक झालेल्या या छापेमारीमुळे लाऊंजमध्ये एकच खळबळ उडाली. पोलिसांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून तपासणी सुरू केली असता, आस्थापनातील ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी आवश्यक साहित्य आणि विविध प्रकारचे फ्लेवर उपलब्ध करून दिले जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी हॉटेल चालकासह तेथे उपस्थित असलेल्या अन्य १३ जणांना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून हुक्का पॉट, विविध फ्लेवर आणि संबंधित साहित्य असा एकूण ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची नोंद करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली.

या प्रकरणी राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण विनियमन) अधिनियम, २००३ मधील कलम ४(अ) आणि २१(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, हुक्का पार्लर चालविण्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. अलिकडच्या काळात हुक्का पार्लरच्या माध्यमातून तरुणांना आकर्षित करून तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन वाढत असल्याबाबत विविध स्तरांतून चिंता व्यक्त केली जात आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवसायांवर अंकुश ठेवण्यासाठी ठाणे पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली असून, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण कारवाई पार पडली. मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माने तसेच त्यांच्या पथकातील पोलीस कर्मचारी यांनी या कारवाईत सक्रिय सहभाग घेतला. पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर हुक्का व्यवसायाला मोठा धक्का बसला असून, अशा प्रकारच्या आस्थापनांवर आगामी काळातही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, शहरात परवानगीशिवाय सुरू असलेल्या हुक्का पार्लर आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात नागरिकांनीही माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागरिकांकडून मिळणाऱ्या गुप्त माहितीच्या आधारे अशा कारवाया अधिक प्रभावीपणे राबविता येत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

आंबिवलीत १३.२५ लाखांचा एमडी जप्त; इराणी तरुणाला अटक, पोलिसांची धडक कारवाई



कल्याण : कल्याण परिमंडळ-३च्या विशेष कारवाई पथकाने आंबिवली परिसरात कारवाई करत १३ लाख २५ हजार रुपये किमतीचा मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ जप्त केला असून एका इराणी तरुणाला अटक करण्यात आली आहे. खडकपाडा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३ कल्याण यांच्या आदेशानुसार विशेष कारवाई पथक आंबिवली परिसरात अंमली पदार्थ विक्रेते, फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी प्रतिबंधात्मक गस्त घालत होते. शुक्रवारी पहाटे सुमारे ३.१० वाजण्याच्या सुमारास वडवलीहून आंबिवलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगेशी बिल्डिंगजवळ पथकाला रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या स्कुटीवरील एका व्यक्तीच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ६६.२६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची किंमत १३ लाख २५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अब्बास हैदर सय्यद इराणी (वय २६, रा. आंबिवली) याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीविरुद्ध यापूर्वीही खडकपाडा पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कारवाई पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र ठोके तसेच पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केली.

उल्हासनगरात कट्टाधारी सराईत गुन्हेगार जेरबंद

उल्हासनगर । उल्हासनगर-4 येथील व्ही. टी.सी. ग्राऊंडजवळ असलेल्या आरती बिअर बार परिसरात गावठी बनावटीचा कट्टा बाळगून बसलेल्या एका सराईत गुन्हेगाराला मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपीकडून 35 हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सहायक पोलीस उपनिरीक्षक रामदास मिसाळ यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की एक संशयित इसम आरती बिअर बार परिसरात अवैधरित्या गावठी कट्टा घेऊन बसला आहे. या माहितीच्या आधारे पीएसआय दराडे व डीबी पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमाला पळून जाण्याची संधी न देता सायंकाळी 6.45 वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने आपले नाव दिलीप नाना ढमढेरे (वय 28, रा. आनंदवाडी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) असे सांगितले. दोन पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीदरम्यान त्याच्या पिशवीतून 35 हजार रुपये किमतीचा काळ्या रंगाचा लोखंडी गावठी बनावटीचा सिंगल बॅरेल कट्टा व 200 रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे पोलिसांच्या धडक कारवाईत शस्त्र जप्त आढळून आली. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी




आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम 3, 25 तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37(1), 135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस निरीक्षक अशोक कोळी व पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय दराडे, एएसआय रामदास मिसाळ, हेड कॉन्स्टेबल सांगळे, दिलीप चव्हाण, पोलीस शिपाई गणेश राठोड व चंद्रकांत गायकवाड यांच्या पथकाने केली.

प्रशासनाने वेळेत दखल घेतली असती तर आज माझे पती जिवंत असते

कल्याण-डोंबिवली। महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरोधात आवाज उठवणाऱ्या एका नागरिकाचा जीव गेल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. डोंबिवलीतील खंबाळपाडा परिसरात काही दिवसांपूर्वी निघृणपणे हत्या करण्यात आलेल्या प्रताप चौधरी यांच्या पत्नी नेहा चौधरी यांनी थेट महापालिका प्रशासन आणि पोलीस यंत्रणेलाच जबाबदार धरत गंभीर आरोप केले आहेत. अनधिकृत बांधकामाविरोधात वारंवार तक्रारी करूनही महापालिकेने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. प्रशासनाने वेळेत दखल घेतली असती तर आज माझे पती जिवंत असते असा संतप्त आरोप नेहा चौधरी यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून संपूर्ण प्रकरणाचा तपास राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडे सोपविण्याची मागणी केली आहे. डोंबिवली पूर्वेतील खंबाळपाडा येथे राहणारे प्रताप चौधरी यांची त्यांच्या घराजवळ अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात टिळकनगर पोलिसांनी मुख्य आरोपी रोहित शेलार याला अटक केली असली तरी ही हत्या केवळ वैयक्तिक वादातून झालेली नसून अनधिकृत बांधकामांच्या विरोधात केलेल्या तक्रारींचा हा परिणाम असल्याचा दावा त्यांच्या पत्नीने केला आहे. प्रताप चौधरी यांनी संबंधित अनधिकृत बांधकामाबाबत केडीएमसीकडे अनेक वेळा अधिकृत तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र त्या तक्रारींवर कोणतीही प्रभावी कारवाई झाली नाही. महापालिकेच्या दुर्लक्षामुळेच आरोपींचे मनोबल वाढले आणि अखेर त्याचा परिणाम या हत्येत झाला असा गंभीर आरोप नेहा चौधरी यांनी केला आहे.

ठाणे पोलिसांची मोठी कारवाई!

पाकिस्तानमधून येणारे ३ कोटींचे ड्रग्ज जप्त... काश्मीरमधील दोन तस्कर अटकेत



ठाणे। ठाणे गुन्हे शाखेने अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई करत पाकिस्तानशी संबंधित आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ रॅकेटचा पदार्फाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले असून काश्मीरमधील दोन सराईत तस्करांना अटक केली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने कळवा येथील खारेगाव परिसरात सापळा रचून ही कारवाई केली. आरोपींकडून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये २ किलो २० ग्रॅम चरस आणि १२ हजार ९७४ ट्रामेडोल कॅप्सूल यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या अंमली पदार्थांची किंमत ३ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. तपासात या रॅकेटचे धागेदोरे थेट पाकिस्तान आणि जम्मू-काश्मीर यांच्याशी जोडलेले असल्याचे समोर आले आहे. हे संपूर्ण जाळे कुपवाडा भागातून कार्यरत होते. पाकिस्तानमधून सीमा ओलांडून हे अंमली पदार्थ प्रथम काश्मीरमध्ये आणि त्यानंतर ठाणे व मुंबई परिसरात पुरवले जात होते. या प्रकरणात फिरोज खान आणि मोटू फुलायचे या दोन मुख्य तस्करांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना १२ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

वृद्ध दाम्पत्याकडून 4 लाख रुपये लुटले, पण खाते बंद केल्याने सायबर ठग संतापला अन्...

मुंबई। ऑनलाइन फसवणुकीला बळी पडल्यानंतर उरलेली रक्कम वाचवण्यासाठी बँक खाते बंद केले अन् सायबर ठग जर तुमच्यावरच संतापला तर... अशीच घटना जोगेश्वरी येथील एका वृद्ध दाम्पत्यासोबत घडली आहे. फसवणूक झाल्यानंतर दाम्पत्याने पोलिसांकडे धाव घेतली. दरम्यान, आंबोली पोलीस ठाण्यात एका अज्ञात भामट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

जोगेश्वरी पश्चिम भागात राहणाऱ्या 69 वर्षीय तक्रारदार महिला आपल्या पतीसोबत (जे उत्पादन शुल्क विभागाचे निवृत्त कर्मचारी आहेत) घरी एकट्याच राहतात, तर त्यांचा मुलगा आणि मुलगी दुसऱ्या शहरात राहतात. भामट्याने अवघ्या तीन दिवसात या दाम्पत्याच्या बँक खात्यातून सुमारे 3.80 लाख रुपये काढून घेतले. या फसवणुकीची सुरुवात 9 जून रोजी झाली, जेव्हा त्या महिलेला एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख ऑनलाइन वस्तू पुरवठा करणाऱ्या कंपनीचा कर्मचारी म्हणून करून दिली आणि जुन्या



व्यवहाराचे पैसे परत (रिफंड) मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्याने महिलेला तिच्या फोनची स्क्रीन शेअर करण्यास सांगितली. त्या महिलेने भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्क्रीन शेअर केली. त्यानंतर तांत्रिक बिघाडाचे कारण सांगून भामट्याने कॉल कट केला. जेव्हा महिलेने तिचे ऑनलाइन वॉलेट तपासले, तेव्हा ते काम करत नसल्याचे तिला आढळले. दुसऱ्या दिवशी (10 जून) त्याच भामट्याने पुन्हा व्हिडीओ कॉल केला. वॉलेट लवकरच सुरू होईल आणि पैसे परत मिळतील असे सांगून त्याने पुन्हा एकदा महिलेची स्क्रीन शेअर करून घेतली. 11 जून रोजी त्याने महिलेला पुन्हा फोन केला आणि कुटुंबातील अशा सदस्याचा क्रमांक मागितला ज्याचे ऑनलाइन वॉलेट सक्रिय आहे. महिलेने तिच्या पतीचा क्रमांक दिला. त्यानंतर भामट्याने महिलेच्या पतीला फोन केला आणि त्यांचीही स्क्रीन शेअर करून घेतली. स्क्रीन शेअर होताच महिलेच्या पतीच्या खात्यातून 98,205 रुपये कमी झाले. त्यांनी तत्काळ आपल्या पत्नीला या घटनेची माहिती दिली. जेव्हा महिलेने तिचे खाते तपासले, तेव्हा तिला समजले की गेल्या तीन दिवसात त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने 2.80 लाख रुपयांहून अधिक रक्कम काढून घेण्यात आली आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच वृद्ध दाम्पत्याने खाते बंद करण्यासाठी बँकेकडे धाव घेतली. तर त्यांच्या मुलीने सायबर हेल्पलाईन क्रमांक 1930 वर तक्रार नोंदवली. खाते ब्लॉक होताच तो भामटा संतापला आणि त्याने त्या वृद्ध जोडप्याला फोन करून खाते ब्लॉक केल्याबद्दल त्यांना धमकावण्यास सुरुवात केली. भामट्याच्या या वागणुकीमुळे घाबरलेल्या जोडप्याने आंबोली पोलिसांशी संपर्क साधून अधिकृत तक्रार दाखल केली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनवले बनावट व्हॉट्सॲप खाते, दोघांना अटक

पालघर: पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट व्हॉट्सॲप अकाऊंट तयार करून नागरिकाची फसवणूक करणाऱ्या दोन सायबर भामट्यांना झारखंड राज्यातून अटक करण्यात पालघर सायबर पोलिसांना मोठे यश आले आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात फसवणूक झालेली संपूर्ण ५० हजार रुपयांची रक्कमही पोलिसांनी हस्तगत केली आहे.या प्रकरणातील फियार्दी विनीतकुमार मुंशीलाल मीणा (वय २८, रा. वागुळसार, पालघर पश्चिम) यांना १७ मे २०२६ रोजी त्यांच्या व्हॉट्सॲपवर एका अज्ञात व्यक्तीकडून संदेश प्राप्त झाला. संबंधित व्यक्तीने आपल्या व्हॉट्सॲप प्रोफाईलवर पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांचा फोटो लावून स्वतःची खोटी ओळख निर्माण केली. विश्वास संपादन करत फियार्दीकडून तातडीने ५० हजार रुपये एका बँक खात्यावर पाठविण्याची विनंती करण्यात आली. फियार्दीनी विश्वास ठेवून रक्कम पाठविली. मात्र नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर सायबर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६६(सी) व ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि बँक खात्यांच्या व्यवहारांची सखोल पडताळणी केली. त्यातून आरोपी बलवंतकुमार कमलप्रसाद मंडल (वय २६) आणि राजुकुमार दुखन रवानी (वय २२), दोघेही धनबाद, झारखंड) येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी झारखंडमध्ये जाऊन दोघांनाही अटक केली. तसेच गुन्ह्यातील अपहृत ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तथा सायबर पोलीस स्टेशनचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक समीर भोसले, रोहित खोत, विशाल शिर्के, राजेश वाघ तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,२३ जुन २०२६ ते २९ जुन २०२६

भारतीय अर्थव्यवस्थेसमोर संकट घोंघावत असल्याच्या मुद्द्यावर अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडेंचे विश्लेषण





गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र एका गोष्टीची चर्चा होते आहे. केवळ ते दिसतंय म्हणून नाही तर त्याची झळ प्रत्येकाला थोड्याफार प्रमाणात बसली आहे. ती म्हणजे जी आर्थिक समस्या सध्या घोंघावत आहे. 'घोंघावत' यासाठी म्हटलं, कारण बरेच जण असाही अंदाज व्यक्त करत आहेत की, अजूनही आव्हानात्मक दिवस पुढे अजून यायचे आहेत. कधी येतील माहीत नाही. किती असतील हेही माहीत नाही. पण खरंच जागतिक अर्थव्यवस्था आणि भारतीय अर्थव्यवस्था ही कशा प्रकारच्या आव्हानांना सामोरी जाते आहे? भीती आहे. संदिग्धता आहे. काय खरं काय खोटं हेही नेमकं कळत नाही. कारण बरचसं बोललं जात आहे. त्याविषयीच समजून घेण्यासाठी आणि बोलण्यासाठी आम्ही ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांच्याशी बोललो. डॉ. अजित रानडे यांना आपण यापूर्वी बऱ्याचदा ऐकलं आणि वाचलं असेल. ते लिखाणही भरपूर करत असतात. पुण्यातल्या 'गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स'चे ते कुलगुरू होते. ते नावाजलेले अर्थतज्ज्ञ आहेत. सध्या ते 'पुणे इंटरनॅशनल सेंटर' या संस्थेमध्ये 'सिनियर फेलो' म्हणूनही काम पाहत आहेत.

डॉ. अजित रानडे यांची 'बीबीसी मराठी'चे प्रतिनिधी मयुरेश कोण्णूर यांनी घेतलेली ही मुलाखत.

प्रश्न : सगळ्यात पहिला प्रश्न हाच आहे की नक्की परिस्थिती काय आहे? सर्वत्र अर्थव्यवस्थेविषयी चर्चा चालू आहे. ही चर्चा केवळ सामान्यजन करत आहेत असं नाही. अनेक अर्थतज्ज्ञही करत आहेत. त्यामुळे अधिक चिंता वाटते. तर खरंच नेमकी परिस्थिती किती चिंताजनक आहे? काहीच दिवसांपूर्वी स्वतः पंतप्रधानांनी एका भाषणामध्ये सांगितलं की सोनं घेऊ नका. परदेश प्रवास टाळा. त्यानंतर आणखीनच ती भीती वाढली. राहुल गांधी विरोधी पक्षनेते आहेत. ते म्हणतात की आर्थिक त्सुनामी येणार आहे, तयार राहा. कसं बघायचं या परिस्थितीकडे?

डॉ अजित रानडे : आर्थिक परिस्थिती चिंताजनक आहे. मात्र त्याची तुलना 1991 च्या आर्थिक संकटाशी करावी तसं हे संकट नाही. तुम्हाला माहिती आहे की आर्थिक संकट हे अचानक येत नाही. म्हणजे जरी आपण आता त्याची चर्चा करतो आहोत तरी ही परिस्थिती अचानक उद्भवली नाही आहे. जी आर्थिक परिस्थिती आहे त्याला अनेक प्रश्न मोठ्या काळात साचत गेल्याची त्याची पार्श्वभूमी आहे. इराणचे युद्ध किंवा 'होर्मुझ'च्या खाडीची नाकाबंदी झाली



आहे त्यामुळे आपल्याकडे काही समस्या झाल्या आहेत. तेलाची किंमत वर गेली आहे किंवा 'एलपीजी'च्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या सगळ्या तत्कालीन समस्या आहेत.

मात्र काही काही समस्या अशा आहेत ज्यांची पार्श्वभूमी ही काही काळापासून तयार होत होती. त्यामुळे परिस्थिती गंभीर होत गेली. आज ती चिंताजनक आहे. ज्यासाठी पंतप्रधानांनी सगळ्यांना जाहीरपणे सांगितलंय की तुम्ही काटकसर करा. परकीय चलन वापरू नका. किंवा सोनं खरेदी करू नका. इंधनाचा वापर कमी करा. त्यांनी हे अपील केलं असेल तर त्याला तशी कारणंही असतील.

जर आपण आकडे बघितले तर काही गोष्टींमध्ये आपली अर्थव्यवस्था अजूनही चांगली व्यवस्थित बळकट आहे असा एका प्रकारचा अंदाज येतो. मात्र इतर अर्थिक निर्देशक (इंडिकेटर्स) खरंच गंभीर आहेत.

प्रश्न : एक युद्ध हे कारण तर दिसतंय. त्याच्यामुळे एकदम आठवड्याभरात साडे सात रुपये पेट्रोल वाढलं. डिझेल त्याच्या आसपासच वाढलं आणि आणखी कदाचित वाढण्याची शक्यता आहे. तुम्ही म्हणालात की हे जरी तात्कालिक कारण असलं. किंवा अमेरिकेनं लादलेले टेरिफचं कारण त्याच्या अगोदर काही काळ दिलं गेलं होतं. त्याचा काही क्षेत्रांवर परिणाम झाला. पण जे याच्याही अगोदर, ज्या साचत गेल्या (क्युमुलेटिव्ह) आपण असं म्हणू, अशा प्रकारच्या गोष्टी समजल्या होत्या का? ते हळूहळू कसं वाढत गेलं? ती कारणं काय होती?

डॉ. अजित रानडे : इराण युद्धामुळे एकदम आपल्याला तेल, तेलाचा पुरवठा, तेलाची किंमत किंवा एलपीजीचा पुरवठा या समस्या एकदम समोर आल्या. तेलाच्या किंमती, म्हणजे कच्च्या तेलाच्या किंमती,जवळजवळ 30-40-50 टक्के वाढल्या. आणि त्यामुळे अर्थातच पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढल्या. पेट्रोल-डिझेलची ही किंमत वाढते त्याचा बोजा फक्त वाहनचालकांवर नसतो. तुम्हाला माहिती आहे की, सगळ्या वाहतूक व्यवस्थेवर, अगदी आपली फळभाज्या वगैरे, या सगळ्यांच्या वाहतुकीवर त्याचा परिणाम होतो आणि तो परिणाम मग थेट आपल्या महागाई दरावर होतो. शेवटी तुमच्या खिशाला तो चटका बसणारच आहे. तेलाचे दर सतत वरखाली होत आहेत. हा सगळा खर्च कोणाच्या खिशातून जातो आहे? काही जातो आहे तेलकंपन्यांच्या. त्यांच्या जो तोटा होतोय त्याच्या तोट्यात भर पडली. थोडीशी वित्तीय तूट केंद्र सरकारच्या खात्यावर जाते. म्हणजे थोडासा बोजा केंद्र सरकारवर थोडासा बोजा तेल कंपन्यांवर आणि बाकीचा बोजा ग्राहकांवर. म्हणजे आपल्यावर.

पण तुम्ही जसं म्हणालात की, युद्ध हे निमित्त झालं. पण अशा इतर आर्थिक प्रक्रिया आहेत जी पार्श्वभूमीवर काही काळ चालू होती. त्यामध्ये एक मोठा एक भाग म्हणजे, जी आपल्याकडे रुपयाची घसरण जी दिसतेय ती नुसती तेलाच्या वाढलेल्या किमतीमुळे झालेली नाही. रुपयाचं मूल्य एकदम अचानक घसरले नाही. म्हणजे गेल्या वर्ष-दोन वर्षात 84 वरून एकदम थेट 97 पर्यंत गेला. म्हणजे जवळ 12-14 चौदा टक्के घसरण जी झाली ती फक्त युद्धामुळे झालेली नाहीये. एक कारण असं आहे की तेलाच्या किमतींमुळे आयात खर्च वाढला, म्हणजे आपला डॉलरमध्ये खर्च वाढला. दुसरं एक कारण असं आहे की, जी परकीय गुंतवणूक आपल्याकडे येते ती कमी झाली. तुम्हाला माहिती आहे की, भारत हा आशियातील एकमेव मोठा देश आहे ज्याचा नेहमी व्यापारात तुटवडा असतो. म्हणजे आपण जेवढा जेवढी आयात करतो ती आपली नियार्तीपेक्षा कमी असते. आयातीवर खर्च होतो म्हणजे कच्चं तेल असो किंवा सोनं असो किंवा इतर काही आपण ते विकत घेतो. आपली इतर काही निर्यात असते. पण निर्यात जेवढी होती, त्याचा तुटवडा होतो. आपण आयात करतो, जी सुमारे 600 बिलियन डॉलर आहे, त्यापेक्षा आपली निर्यात कमी पडते.

तर मग तो तुटवडा तो कोण भरून काढतो? तर ती जी परकीय जे पैसे येतात म्हणजे ,ज्याला आपण गुंतवणूक पैसे म्हणतो, त्यामुळे ही तूट भरुन निघते.



यात एफडीआय किंवा एफआयआय, स्टॉक मार्केट मध्ये जो पैसा येतो तो असतो. पण जेव्हा एखादा परकीय गुंतवणूकदार इथे नवीन फॅक्टरी उभारतो ती काही निर्यात नसते. तर तो आपली गुंतवणूक इथे आणतो. एखाद्या फॉरेन बँकेने अदानी-अंबानी-बिर्ला-टाटा लोकांना जर लोन दिलं डॉलर लोन दिलं तो पैसा भारतात येतो. पण ती काय आपली निर्यात नव्हे. या गुंतवणुकीतून किंवा ज्याला फॉरेन लोन म्हणतात किंवा स्टॉक मार्केट मध्ये जो पैसा येतो, त्या पैशांमुळे आपली तूट भरुन निघते.

तर गेली कित्येक वर्षं, जवळजवळ तीस पस्तीस वर्ष अशी परिस्थिती आहे, की आपल्याला जी काही व्यापारात तूट असायची, ती या गुंतवणूक किंवा फॉरेन लोनच्या पैशातून किंवा स्टॉक मार्केटच्या पैशातून त्याची भरपाई व्हायची. त्याला 'बॅलन्स ऑफ पेमेंट' म्हणतात. ते अकाउंट नेहमी पॉझिटिव्ह असायचं.

गेल्या तीन-चार वर्षांमध्ये एक मोठा फरक असा झाला आहे की, 'नेट एफडीआय' ज्याला आपण म्हणतो, म्हणजे आत येणारा पैसा आणि बाहेर जाणारा पैसा यांच्यातला फरक, तो नेट एफडीआय तो खाली खाली घसरत चालला आहे आणि आता तो जवळजवळ शून्यावर आलेला आहे. त्यामुळे जो डॉलरचा तुटवडा असायचा, त्याची भरपाई कशी करायची? जो तुटवडा भरून निघायचा तो कॅश-फ्लो जणू आता आटला आहे. अशा वेळेस कोण कुठून पैसे आणणार? मग आपल्या रिझर्व्ह बँकेला डॉलर्स विकावे लागतात. रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीतून ते काढावे लागतात. ज्याला आपण बऱ्याचदा गंगाजळी असा शब्द वापरतो. गंगाजळीतनं काढावे लागतात आणि त्यामुळे रुपयावर जो दाब आलेला आहे त्यातून एकीकडे आयातीचा खर्च वाढला, तेलाची किंमत वाढली. पण दुसरीकडे 'नेट एफडीआय' आता शून्याकडे चालला आहे. म्हणजे परकीय गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर आत्मविश्वास होता तो कमी होतोय की काय? ही एक नवीन चिंता आहे. अजून त्यावर, भारतीय लोकांचा पैसा जो बाहेर जातोय. म्हणजे भारतीय गुंतवणूकदार जो परकीय देशांमध्ये गुंतवणूक करतो त्यानं आपल्याकडचे जे पैसा बाहेर जातो. तुम्हाला माहिती आहे की जवळजवळ 10-15 बिलियन डॉलर्स जेव्हा लोक आपल्या मुलांना बाहेर दुसऱ्या देशांमध्ये परदेशात शिक्षणाला पाठवतात त्यावर खर्च होतो. टुरिझमवर खर्च होतो. पर्यटनावर तर हा जो बाहेर जाणारा पैसा आहे तो खूप वेगाने जातोय आणि एकूणच ही परिस्थिती गेली तीन चार वर्ष चालू आहे. म्हणजे, मला हे सांगायचंय की आजची जी अर्थव्यवस्थेची चिंताजनक स्थिती आहे त्याला ही अशी विविध प्रश्नांची पार्श्वभूमी आहे.

गुंतवणूकांचे महत्त्वं

प्रश्न : परदेशी गुंतवणुकीची जी समस्या आहे त्याविषयी बोलूया. काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ सुरजित



भल्ला यांनीही जाहीरपणे म्हटलं होतं की परदेशी गुंतवणूकदारांसाठी भारत एकदम नकारात्मक मार्केट बनत चाललाय. दुसरीकडे सरकारकडून वेगळं सांगितलं जातं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काही दिवसांपूर्वी त्यांना हाच प्रश्न विचारला तेव्हा ते असं म्हणाले की 'एफआयआय' मधून, म्हणजे मार्केट मधून पैसा बाहेर काढत असतील. पण त्याच वेळेस तुम्ही 'एफडीआय' बघा. डेटा सेंटर्समध्ये आता बऱ्याचश्या बाहेरच्या कंपन्या भारतात येऊन इन्वेस्ट करतात. त्यामुळे जाणाऱ्या पैशाकडे बघण्यापेक्षा येणाऱ्या पैशाकडे बघा. तुम्ही म्हणालात की गुंतवणूकदारांचा विश्वास कमी झाला. अगोदर भारतीय मार्केटमध्ये गुंतवणुकदार येत होते. आता ते पैसा बाहेर काढतात. त्याला भारतातली परिस्थिती कारणीभूत आहे का? त्याला जागतिक परिस्थिती काही कारणीभूत आहे का? असं का व्हावं?

डॉ. अजित रानडे : आता परदेशी पैसा, म्हणजे परदेशी गुंतवणूकदारांचा पैसा, येतो आहे हे बरोबर आहे. त्याचं प्रमाण कमी-जास्त होत असेल. पण बाहेर जाणाऱ्या पैशाचा वेग वाढतोय. त्यामुळे जो 'नेट एफडीआय' ज्याला म्हणतो, म्हणजे शाश्वत अशी गुंतवणूक, तो FII किंवा stock market चा पैसा असतो, तो गेले दोन वर्ष म्हणजे चोवीस महिने सातत्याने तो बाहेर जातो आहे. जवळजवळ चाळीस-पन्नास अब्ज डॉलर पैसा बाहेर गेला आहे. त्यामानाने आपलं stock market एवढं पडलं नाही. मार्केट या धक्क्यानं न पडण्याचं कारण म्हणजे जेव्हा परदेशी FII गुंतवणूकदार आणि त्यांचे पैसे बाहेर जात आहे, तेव्हा retail चा पैसा stock market मध्ये येतोय. त्याला SIP म्हणतात. Systematic investment plan. जो परदेशी पैसा जातोय त्याचा परिणाम आपले गुंतवणूकदार सामथ्यार्ने ते थोपवून धरतायत. पण त्याला तो एक trap एक प्रकारचा असं मला वाटतं. प्रश्न : हे जे गुंतवणुकीबद्दल बोलतो आहोत त्याचा सामान्य लोकांच्या आयुष्यावर काय परिणाम होतो आहे? मग तो इथल्या industries वर असेल, त्याच्या job creation वर असेल, त्यावर काय परिणाम होतो आहे? डॉ. अजित रानडेः पहिलं म्हणजे की आपल्याकडे परकीय चलनाची जी गंगाजळी आहे त्यावर परिणाम होतो आहे. आपल्याला ठराविक गोष्टी आयात कराव्या लागतात. उदाहरणार्थ, कच्चं तेल, इंधन, LPG खत म्हणजे कृषीला लागणारी खतं. हे सगळे अनिवार्य आहे. म्हणजे अर्थव्यवस्थेला त्याची गरज आहे. तर तेवढी तुमच्याकडे गंगाजळी हवी. ती घसरू लागली तर त्याच्याबद्दल काळजी घ्यावी लागते. तिथेच Reserve Ban' चा हस्तक्षेप होतो. त्याचा परिणाम असा होतो की जर रुपया जर घसरला तर तुम्ही ज्या गोष्टी आयात करताय तेल असो, इंधन असो खत कृषी लागणारी खत असो तर ते महाग होतात. जर तो महागाईचा जो rate आहे, त्याचा बोजा तो जर तुम्ही शेतक्यावर किंवा सामान्य जनतेवर जर टाकला नाही तर कुठे तरी तो खचार्चा बोजा सरकारला मोजावा लागतो आणि तो मग वित्तीय तुटीत त्याचा स्वरूप होतो. त्यामुळे सामान्य माणसावर एक बोजा म्हणजे महागाईची महागाई जी वाढती आहे ती आता हळूहळू आपल्याला दिसतेय.

दुसरी गोष्ट म्हणजे की रोजगार. तुम्ही मघाशी यांचा उल्लेख केला की मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की data center मध्ये गुंतवणूक येत आहे. ते बरोबर आहे. आंध्र प्रदेशमध्ये Google ने त्याची घोषणा केली आहे. पण त्यातून रोजगार किती निर्मिती होते? ऊंल्लशे१ मध्ये रोजगार निर्मिती काही होत नाही फारशी. Data center मध्ये एक मोठे server असतात. त्याला प्रचंड प्रमाणात electricity लागते. वीज लागते, पाणी लागतं. पण रोजगार निर्मिती मात्र त्या प्रमाणात होत नाही.

अशी गुंतवणूक आपल्याला पाहिजे की ज्याच्यातून रोजगार निर्मिती झाली पाहिजे. लघु उद्योगांना त्याचा फायदा झाला पाहिजे आणि म्हणजे त्या त्या दृष्टीने जर बघितलं तर तेवढी गुंतवणूक होत नाहीये. विशेषतः खाजगी गुंतवणूक. म्हणजे खाजगी क्षेत्रातून येणारी. ती परकीय असो किंवा भारतीय असो.

डॉ. अजित रानडे मुलाखत

प्रश्न : गेल्या वर्षी तुम्ही एक लेख लिहिला होता आणि जर भारताला 8 टक्के किंवा त्यापेक्षाही अधिक विकास दर जर गाठायचा असेल तर खाजगी गुंतवणूक येणं आवश्यक आहे. ते आत्ता होताना फारसं दिसत नाहीये. गेल्या आठवड्यात World इंल्ल' ने जे forecast केले त्यात भारताचा विकास दर यावेळेस साडेसहा टक्क्यांपर्यंत असा राहील असं म्हटलं आहे. खाजगी गुंतवणूक नसल्यामुळे असं होतं आहे का? उदारीकरणानंतर जी एक 'इंडिया स्टोरी' सुरु झाली होती तिला आता अडथळे येत आहेत का?डॉ. अजित रानडे : दहा-पंधरा वर्षांपूर्वी जर तुम्ही बघितलं तर GDP मध्ये खाजगी गुंतवणुकीचं 15 ते 18 टक्के वगैरे प्रमाण असायचं. ते आता जवळजवळ अकरा टक्के पर्यंत आलेलं आहे. त्यामुळे खाजगी गुंतवणूक जी जेवढी असायला हवी तेवढी होत नाहीये. दुसरी गोष्ट म्हणजे जो आर्थिक विकास दर आहे तो. पंतप्रधानांनीही पण त्यांच्या भाषणात उल्लेख केलाय की गेल्या वर्षी आपण 7.7 टक्के विकास दर होता. म्हणजे एकीकडे तुमचा growth rate ब्यापैकी चांगला दिसतो. पण मुख्य प्रश्न हा आहे की लोकांच्या आयुष्यात किंवा त्यांच्या घरगुती उत्पन्नात त्याची तेवढी वृद्धी दिसते का? हे जे कोडं आहे, त्याचं असं एक explan ation असं आहे की, आपण जास्तीत जास्त रस्ते बांधणी केली किंवा data center आले किंवा मोठे मोठे काही इन्फ्रस्ट्रक्चर प्रोजेक्ट्स, एअरपोर्ट्स वगैरे बांधले, तर त्याचं तुम्हाला GDP मध्ये त्याच्यामुळे वाढ झालेली दिसेल. पण ती सरकारचीच गुंतवणूक असते. खाजगी गुंतवणूक होतच नाही किंवा कमी होतीये. सरकारी गुंतवणूक भरपूर होतीये. त्याचं रोजगारात रुपांतर किंवा वैयक्तिक उत्पन्नावर त्याचा हवा तसा परिणाम होत नाही. त्यामुळे आपण बघतोय की गेली बरेच वर्ष जी ज्याला आपण 'वेज रेट' म्हणतो, म्हणजे वेतन, विशेषतः ग्रामीण भागातले, ते वाढलेलेच नाही आहेत. कित्येक वर्षात घरटी उत्पन्न त्याच्यात जेवढी वृद्धी व्हायला पाहिजे तेवढी होत नाहीये. तुमचा जर GDPचा दर जर तुमचा साडेसात-पावणेआठ टक्के असेल तर nominal rate जवळजवळ नऊ-दहा टक्क्यापर्यंत. पण दरवर्षी तुमचा घरगुती उत्पन्न दहा बारा टक्क्यांनी वाढतंय का? नाही. तर तो वाढता विकासदर कसा काय?

तर हेच का प्रकारचं कोडं आहे की एकीकडे GDP मात्र वृद्धी होत आहे, पण जास्तीत जास्त त्याचा फायदा कोणाला कुठल्या वर्गाला होतोय वर्गाला होतोय? आणि त्याचा एक अजून एक निर्देशक आहे आर्थिक विषमता. ग्रोथ आहे, पण त्याचा जास्तीत जास्त फायदा एका ठराविक वर्गालाच जातोय किंवा छोट्या वर्गाला. श्रीमंत किंवा capitalist वर्गाला. रोजगारावर जे अवलंबून असतात त्यांना तेवढा त्याचा फायदा होत नाहीये.

'रोजगार निर्मितीकडे लक्ष द्यावे'

प्रश्न : पण असं का झालं असावं? म्हणजे कोणती धोरणं नेमकी चुकली? हा नेमका प्रश्न तुम्ही उपस्थित केलात की बाकी आकडे वाढताना दिसतात किंवा फार कमी होताना दिसत नाहीत.पण दुसरीकडे उत्पन्नामध्ये वाढ मात्र नाही. ग्रामीण अर्थव्यवस्था असेल किंवा जो unorganized sector आहे शहरामधला पण तिथे होताना दिसत नाहीये. आता organized sector मध्ये सुद्धा job creation होत नाहीये. लोकांना नोक्या नाही येत असं वारंवार सगळीकडे दिसतंय. पुण्यातल्या काही IT कंपन्यांमध्ये शेकडो लोकांना काढण्याचं दिसतं आहे. यात काय नेमकं चुकलं? काय धोरणं चुकली?डॉ. अजित रानडे : चुकली असं नाही. पण आपली दिशा आपण ती तपासली पाहिजे. त्याची चिकित्सा केली पाहिजे. ती चूक आहे किंवा बरोबर. सुरुवातीला बरीचशी धोरणं अशी असतात की ती प्रायोगिक असतात. आता तुम्हाला उदाहरण देतो. परत आपण त्या data center चं उदाहरण घेऊ. Data center मध्ये जवळजवळ पंधरा अब्ज डॉलर येणार आहेत. म्हणजे दीड लाख कोटी रुपये कमीत कमी असेल. पण त्यातनं रोजगार किती उत्पन्न होतोय? जर रोजगार उत्पन्न नाही तर काय?त्यामुळे श्रमप्रधान अशी जी धोरणं असतात ती महत्त्वाची. श्रमप्रधान जे जे उद्योग आहेत आपली निर्यात घ्या. काही क्षेत्रात आपण नियार्तीला जास्ती प्रोत्साहन देतो. आता PLI सारखी production



linked incenftive आहे. आपण त्याच्यामध्ये फक्त किती गुंतवणूक झाली आहे, त्यांचा किती revenue झाला हे पाहतो. पण त्याच्यातनं किती रोजगार निर्मिती झाली ते आपण बघत नाही. रोजगार निर्मिती मात्र झाली पाहिजे. म्हणजे ज्याला आपण labour intensive म्हणतो ,श्रमप्रधान, अशी धोरणं हवीत. आपण पूर्व आशियातल्या देशांकडे चाळीस वर्षांपूर्वी बघितलं, कोरिया, सिंगापूर किंवा तैवान, जपान सारख्या देशांमध्ये निर्यात आधारित उद्योगांमुळे विकास झाला. त्यांच्या नियार्तीत त्यांचा विकास झालेला आहे. पण ती निर्यात कशी होती पूर्वी? श्रमप्रधान क्षेत्रांना जास्ती प्राधान्य होतं. Labour intensive export ना जास्ती प्राधान्य होतं. त्यांना जास्त उत्तेजन होतं. आपण त्याच्यावर तेवढा जोर दिलाय का? आपल्या धोरणांमध्ये तेवढा आहे का? MSME म्हणजे सूक्ष्म आणि लघु उद्योग क्षेत्राचं जवळजवळ तीस ते चाळीस टक्के योगदान असतं रोजगारामध्ये आणि नियार्तीमध्येही. पण तितक्या प्रमाणात त्यांना बँकेचे credit मिळत नाही. तितक्या प्रमाणात त्यांना जो परतावा मिळायचा तो मिळत नाही. अंमलबजावणीत टरटए क्षेत्र नेहमीच हेलकावे खात असतात.

जिथं रोजगार निर्मिती होते अशा क्षेत्रांकडे लक्ष दिलं गेलं पाहिजे. आता काय होतं की जिथे रोजगार निर्मिती होत नसेल किंवा जिथे जेवढा जेवढं उत्पन्न खालच्या वर्गाला मिळत नसेल, तर केंद्र सरकार असो, राज्य सरकार असो कल्याणकारी योजना काढतात. ज्याला काही जण ाश्रीु२ म्हणतात. आता 'लाडकी बहीण' घेऊ किंवा ढट सन्मान ज्याला म्हणतात. Direct transfer च्या योजना आहेत किंवा Direct अन्न पुरवणाया. 'अन्नसुरक्षा'खाली आपण जवळजवळ दर दर कुटुंबाला जवळजवळ पस्तीस किलो गहू किंवा तांदूळ किंवा ज्वारी बाजरी दर महिन्याला आपण फुकट देतो. तर हे सगळं करावं का लागतं? कारण त्यांचं उत्पन्न होत नाहीये.

तुम्ही 'रोजगार हमी योजने'चा उल्लेख केला. रोजगार हमी योजनेचा खरा अर्थ काय होता की ती एक प्रकारची विमा योजना होती.

एखाद्या ग्रामीण भागात जर दुष्काळग्रस्त किंवा काही कारणांनी जर तिथे काही ११२ आला आणि लोकांना काही इतर रोजगार जर मिळत नसेल तर त्यांना रोजगार हमी योजनेत एक प्रकारची ल्ल२४१ल्ली मिळायचा. ती परिणामकारक यासाठी होती कारण बेरोजगारी वाढली तर त्यांना काम मिळायचं. तो एक हक्क होता. त्यातला तो हक्क आपण काढून घेतला आहे. आता त्या जागी जी नवीन योजना आहे, एक तर हक्क त्यातला बराचसा निघून गेलाय किंवा dilute केलेला आहे. दुसरा म्हणजे जो केंद्र सरकारचा संपूर्णपणे जो बोजा असायचा, 60-70 हजार कोटी रुपये वर्षाला, त्यातला जवळ जवळ 40 टक्के बोजा आता राज्य सरकारवर आलेला आहे. राज्य सरकारच्या तिजोरीवर तसाही ताण असतोच. त्यात आता अशी एक चिंता आहे की बरेचसे कार्यक्रम-योजना कमी केले जातील.

डॉ. अजित रानडे मुलाखत

प्रश्न : लाडकी बहीण असेल किंवा बाकीच्या कुठल्या direct trÔ»»fsfer च्या योजना केवळ महाराष्ट्रात नाही इतरही राज्यांमध्ये तर राज्य सरकारांनी आणि केंद्र सरकारनही घोषित केल्या आहेत. पण यासारख्या योजनांमुळे सरकार थेट मदत तर करतं पण रोजगारनिर्मितीकडे दुर्लक्ष होतं असं तुम्हाला वाटतं का?

डॉ. अजित रानडे : हो अगदीच. कारण कल्याणकारी योजना आणि freebie योजना ह्याच्यात फरक आहे. जरी ती रेषा खूप बारीक असली तरीही त्यांच्यात फरक आहे. लाडकी बहीण सारखी जी योजना आहे अशा योजना जवळजवळ वीस राज्यांमध्ये राबवल्या जात आहेत आणि केंद्र सरकारच्या पण आहेत. ते एकूण त्याचा सगळा खर्च बघितला तर दहा लाख कोटी रुपये आह. म्हणजे GDP ¨या अडीच टक्के खर्च दरवर्षी होतो आहे. तुम्ही जो खर्च करत आहात त्यातले welfare म्हणजे कल्याणकारी कुठल्या आणि freebie कुठल्या यावर आपली चर्चा होऊ शकते. पण तो जो खर्च होतो तो बजेटमधनं जातो. त्यामुळे इतर जे आरोग्यावर किंवा कृषी सिंचन असो पायाभूत सोयी असो किंवा training म्हणजे कुशल कौशल्य वाढवणं ह्याच्यावर तो खर्च होत नाही. त्याचे जो त्याचे जे परिणाम असतात ते दीर्घकालीन असतात. तुम्ही या वर्षी इकडचा पैसा काढून तिकडे टाकला. पण ती गुंतवणूक नाही. जो आपण शिक्षण आणि स्वास्थ्यामध्ये जो खर्च करतो तो खर्च नसून ती गुंतवणूक असते. त्यातनं जे humancapital जे मानवी भांडवल तयार होत असतं आणि ते तुम्ही भांडवल तयार नाही केलं तर त्याचा परिणाम तुम्हाला भविष्यात भोगावा लागेल.

संपादकीय

गडकरींची मुंबई-गोवा महामार्गावरील महाथाप!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



भाजपचे खासदार नारायण राणे यांच्या १० एप्रिल रोजी सार्जया झालेल्या पंच्चाहत्तराव्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मे महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचा शब्द जाहीरपणे व्यासपीठावरून दिला होता. मे महिना संपून आता जूनचा पहिला आठवडा सुरू आहे. परंतु, या महामागार्चे काम रखडलेल्या अवस्थेतच असून गडकरींचा शब्द ही पुन्हा एकदा मारलेली राजकीय महाथापच ठरली आहे. मुंबई-गोवा महामागार्चे काम पूर्ण करण्याकरिता ३१ मेची डेडलाईन पाळण्याच्या दृष्टीने प्रशासकीय धडपडही होताना दिसली नाही. केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपला दिलेला ३१ मे रोजीचा शब्द पाळण्यासाठी राजकीय प्रयत्नही होताना जाणवले नाहीत. नेहमीप्रमाणे जसे अगदी मुंबई-गोवा महामागार्चे काम सुरू असते तसेच अगदी संथगतीनेच या महामागार्चे काम सुरू राहिले. आता तर काय पावसाळ्याला सुरुवात होणार असून या महामार्गाच्या कामाला पुन्हा एकदा ब्रेक लागणार आहे. त्यानंतर पुन्हा हे काम कधी सुरू होणार आणि ते पूर्णत्वास जाईपर्यंत आणखी किती काळ राजकीय थापा ऐकायला मिळणार, हे देवालाच ठाऊक. नुसत्या थापा मारून या महामागार्चे काम कधीच पूर्ण होणार नाही, याचे समाजभान किमान मंत्र्यांनी जपणे आवश्यक आहे. मुंबई-गोवा महामागार्बाबत नितीन गडकरी यांनी दिलेले आश्वासन हवेतच विरल्याची आणि कोकणवासीयांच्या पदरी निराशा येण्याची ही काही पहिली वेळ नाही. केवळ गडकरीच कशाला गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या अनेक वजनदार राजकीय नेत्यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या कार्मांविषयी आश्वासन देणे आणि नेहमीप्रमाणे काम रखडणे याची कोकणवासीयांना जणू सवयच झाली आहे. यापूर्वी नितीन गडकरी यांनी गेल्या वर्षी जून २०२५ मध्ये मुंबई-गोवा महामागार्चे काम पूर्ण होणार असल्याचे आश्वासन १९ एप्रिल २०२५ रोजी एका जाहीर व्यासपीठावरून दिले होते. जून २०२५ काय जून २०२६ सुरू झाला तरी मुंबई-गोवा महामागार्चे काम रखडलेल्या अवस्थेत आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मुंबई-गोवा महामागार्चे काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाले असून केवळ १० टक्क्यांचेच काम बाकी असल्याचे सांगितले होते. लवकरच पूर्ण होईल, असे आश्वासन त्यांनीदेखील दिले होते. परंतु, यंदाच्या गणेशोत्सवापर्यंत तरी ते पूर्ण होईल की नाही, हे येणारी वेळच ठरवेल. शिवेसना (उबाठा) खासदार अरविंद सावंत यांनी गेल्या वर्षी संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभा सभागृहात मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीविषयी प्रश्न उपस्थित केला होता. भारताला चंद्रावर पोहोचण्यासाठी जितका खर्च झाला नाही त्यापेक्षाही अधिक खर्च करूनदेखील मुंबई-गोवा महामागार्चे काम १५ वर्षांपासून अधिक काळ रखडून ते अपूर्णावस्थेत असल्याचे अरविंद सावंत यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले होते. अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला त्यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर देताना मुंबई-गोवा महामागार्चे काम एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण करू, असे सभागृहाला आश्वस्त केले होते. परंतु, हीदेखील एक राजकीय थापच ठरली. जून २०२५, एप्रिल २०२६ आणि मे २०२६ पर्यंत मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण करण्याचा राजकीय शब्द अशा एकामागोमाग एक राजकीय थापांमुळे कोकणवासीयांचा नितीन गडकरी यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. याउलट एकामागोमाग एक थापांमुळे कोकणवासीयांच्या संतापात आणखी भर पडत आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामाचा खर्च चांद्रयान-३ मोहिमेपेक्षा सुमारे ६१५ कोटी रुपये अधिक आहे. म्हणजेच भारताची चंद्रावर जाण्याची वाट ही मुंबई-गोवा महामार्गाच्या तुलनेत अधिक स्वस्त आणि कमी खर्चिक आहे. मुंबई-गोवा महामागार्चे काम २०११ साली सुरू झाल्यानंतर सुरुवातीला सुमारे ८ हजार कोटींचा यासाठी अंदाजे खर्च व्यक्त करण्यात आला होता. परंतु, अनेक वर्षांच्या विलंबाने वाढून हा खर्च १५ ते १६ हजार कोटींच्या वर गेल्याचे सांगण्यात येते. पर्यावरणविषयक आवश्यक परवानग्या, भूसंपादनाची जटिल प्रक्रिया आणि कंत्राटदारांच्या बदलत्या कारभारामुळे या प्रकल्पाला तब्बल १५ वर्षांहून अधिक काळ लागला असून खर्चही मोठ्या प्रमाणात झाला आहे. तरी महामार्ग अपूर्णच आहे. चांद्रयानच्या २ मोहीम अयशस्वी जरूर ठरल्या. परंतु, चांद्रयान-३ च्या यशानंतर भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाय ठेवत जगात नव्या इतिहासाची नोंद केली. भारत चंद्रावर पोहोचला तरी कोकणवासीयांचा मुंबई-गोवा महामार्गावरील रखडपट्टीचा संघर्ष काही थांबलेला नाही. मुंबई-गोवा महामार्गाचेकाम मे २०२६च्या डेडलाईनपर्यंत पूर्ण झालेले नाही. याउलट टोल सुरू करण्याची घाई केली. जून ते सप्टेंबर हे पावसाचे दिवस राहणार असून यादरम्यान काम होणार की नाही, तसेच झाले तरी किती प्रमाणात महामागार्चे काम होणार, त्याचा वेग कितपत असणार, यासोबतच त्याचा दर्जा, असे अनेक प्रश्न कोकणवासीयांच्या मनात आहेत. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यापासून तर गणेशोत्सवाची लगबग सुरू होईल. यंदाही कोकणवासीयांची काही मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीतून सुटका नाही. पावसाळ्यात या महामार्गावरील प्रवास अधिकच खडतर आणि धोकादायक होणार आहे, हे स्पष्ट आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या प्रवासातही मुंबई-गोवा महामार्गावर प्रवास करताना खड्डे आणि चिखलातूनच वाट काढावी लागणार आहे. मे महिन्याचे आश्वासन हवेत विरल्यानंतर आता पुढे काय, याचे कोणतेही उत्तर सत्ताधार्यांकडे सध्या तरी नाही. मे महिन्याचे आश्वासन हवेत विरल्यामुळे आता कोकणवासीयांच्या छातीत धडधड वाढली आहे, हे काही वेगळे सांगायला नको. कारण, पावसाळा तोंडावर आहे.

कोकणातील मुसळधार पावसात अर्धवट राहिलेल्या रस्त्यांची काय दुरवस्था होते, हे कोकणवासीय चांगलेच ओळखून आहेत. धुळीचे रूपांतर चिखलात होईल. खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढणार नाही, याची हमी सरकार देणार का? खड्डेमय रस्ते, चिखलयुक्त महामागार्मुळे होर्णाया वाहतूक कोंडीतून वाट कशी काढायची? जेमतेम ६ ते ८ तासांच्या प्रवासासाठी कोकणवासीयांनी १२ ते १५ तास का खर्ची घालायचे, याची उत्तरे कोण देणार? एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इंधन बचतीचे आवाहन करत आहेत. परंतु, मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीमुळे अनेक जण ६ ते ८ तासांऐवजी १२ ते १५ तासांचा प्रवास करत आहेत. त्यातून होर्णाया इंधनाचा अपव्यय सरकारला दिसेनासा झाला आहे का? केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी, जे देशात ह्यहायवे किंगह्ण म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कामाचा वेग थक्क करणारा आहे. दिवसाला सरासरी अनेक किमी लांबीपर्यंत रस्त्यांची निर्मिती करत त्यांनी देशात नवा आदर्श उभा केला आहे. जवळपास १२ वर्षांपासून केंद्रात मंत्री असर्णाया गडकरी यांनी अनेक महत्त्वाच्या महामार्गांची निर्मिती करत देशाच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. ते दुर्लक्ष करता येणार नाही. नितीन गडकरी यांनी देशभरात एक्सप्रेसवेचे जाळे विणले आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मुंबई आणि पुणे यांसारख्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडण्यासाठी एक्स्प्रेस वेची निर्मितीदेखील गडकरी यांनीच केली होती. दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वे किंवा नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग ज्या वेगाने पूर्ण झाले, ते पाहता मुंबई-गोवा महामार्गही लवकर पूर्ण होईल, अशी रास्त अपेक्षा होती. परंतु, कोकणवासीयांनी या महामागार्साठी जमिनी दिल्या नसल्याची खंतदेखील ते वेळोवेळी मांडत आले आहेत. कोकणात जमिनीच्या लहान तुकड्यांमध्येही अनेक भावंडे वाटेकरी असतात. अनेकदा त्यांच्यात एकमत होत नाही. वारंवार कोर्टात खटले दाखल होतात. त्यामुळे भूसंपादनही मोठ्या प्रमाणात रखडले आहे. मुंबई-गोवा महामार्ग रखडण्यामागे भूसंपादनाची ही जटिल प्रक्रिया आणि येथे कंत्राटदार टिकत नसल्याची दोन महत्त्वाची कारणेदेखील ते देतात. तीही विचारात घेणे आवश्यक आहे. कारण कोकणची माणसं साधी भोळी, असे गीतामध्ये म्हटले असले तरी मुंबई-गोवा हा एकच मार्ग इतकी वर्षे का रखडला याचा विचार करायला हवा. नितीन गडकरी यांनी हाती घेतलेले देशातील अन्य महामार्ग प्रकल्प मार्गी लागतात, मग हा एकमेव प्रकल्प इतकी वर्षे कसा काय रखडतो, याचाही विचार व्हायला हवा. कारण एका बाजूला सरकार आहे, तर दुर्सया बाजूला कोकणातील लोक आहेत. जेव्हा आपण सरकारकडे बोट दाखवतो, तेव्हा तीन बोटे आपल्याकडे असतात, हेही विसरता कामा नये. मुंबई-गोवा महामार्ग तयार करणारे अनेक कंत्राटदार तर कोकणातील स्थानिक राजकीय नेत्यांना हप्ते देऊन कंगाल झाले आहेत, अशीही चर्चा आहे. त्यात पुन्हा हा महामार्ग रखडण्यात कोकणी माणसांचा आडमुठेपणाही कारणीभूत आहे, हेदेखील लक्षात घ्यावे लागेल. कुठल्याही समस्येतून सामोपचाराने मार्ग काढण्यापेक्षा कोर्टकर्चेया करून वर्षानुवर्षे प्रकरण लटकवून ठेवण्याची कोकणी माणसाला जुनी सवय आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. कोकणातील लोकप्रतिनिधी आणि लोक यांनी या महामागार्बाबत आत्मचिंतन करण्याची गरज आहे. तरच तो पूर्णत्वास जाईल. अन्यथा, राजकीय नेत्यांच्या थापा ऐकत राहण्यावाचून गत्यंतर उरणार नाही.

विनोद की विकृती?



अलीकडच्या काळात स्टँड-अप कॉमेडीच्या क्षेत्रात घडणाऱ्या विविध घडामोडींमुळे एक अत्यंत गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आज अश्लीलता, द्विअर्थी संवाद, शारीरिक रचनेची विडंबना आणि इतरांच्या मानहानीतून निर्माण होणाऱ्या हास्यालाच विनोद मानण्याची गल्लत केली जात आहे. पण विनोद हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून ते समाजाला आरसा दाखवणारे, मानवी स्वभावातील विसंगतींवर बोट ठेवणारे आणि माणसाला अधिक संवेदनशील बनवणारे एक प्रभावी साधन आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. प्रणित मोरेच्या कार्यक्रमातील हिमांशू नावाच्या तरुणाचा वादग्रस्त किस्सा असो किंवा डॉ. सेजल पवार यांची विधाने असोत; या घटना केवळ वैयक्तिक पातळीवरील चुका नाहीत. या घटनांकडे एका व्यापक सामाजिक-सांस्कृतिक मानसिकतेचे लक्षण म्हणून पाहण्याची गरज आहे. जेव्हा मनोरंजनाच्या नावाखाली मानवी प्रतिष्ठा, स्त्रियांचा सन्मान आणि व्यावसायिक नैतिकता वेशीवर टांगली जाते, तेव्हा समाज म्हणून आपण नेमके कुठे चाललो आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आलेली असते. महाराष्ट्राला विनोदाची आणि वैचारिक प्रबोधनाची एक अत्यंत समृद्ध आणि जाज्वल्य परंपरा लाभलेली आहे. व्यंग, उपरोध, उपहास, कोटी आणि सामाजिक भाष्य यांचा एक सुरेख संगम मराठी साहित्यात आणि रंगभूमीवर नेहमीच पाहायला मिळाला आहे. प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील यांच्यासारख्या लेखकांनी विनोदाला केवळ क्षणिक मनोरंजनाचे साधन मानले नाही, तर त्याला समाजप्रबोधनाचे आणि मानवी नातेसंबंध जोडण्याचे माध्यम बनवले. या पारंपरिक आणि आताच्या विनोदाचा जर आपण सूक्ष्म अभ्यास केला, तर या दोन्ही कालखंडांतील केंद्रबिंदू आणि उद्देशांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक पडल्याचे दिसून येते. सादरीकरणाच्या पद्धतीमध्येही हाच मोठा फरक प्रकर्षाने जाणवतो. पुलंनी त्यांच्या साहित्यातून आणि सादरीकरणातून असंख्य अजरामर व्यक्तिरेखा निर्माण केल्या. आपण त्या पात्रांवर मनापासून हसतो, पण कधीही त्यांचा तिरस्कार करत नाही; उलट त्यांच्याबद्दल एक अनामिक आपुलकी निर्माण होते. पात्रांबद्दल आपुलकी निर्माण करून त्यांच्या विसंगतीवर हसवण्याची ही हास्यसंस्कृती होती. अत्र्यांच्या व्यंगामध्ये धार होती, पण ती समाजातील ढोंगीपणावर आणि अन्यायावर प्रहार करणारी होती. मिरासदार आणि शंकर पाटील यांच्या कथांमधील विनोद ग्रामीण जीवनातील साध्या, निष्पाप विसंगतींमधून उगम पावत असे. या सर्व महान लेखकांच्या लिखाणात माणसांना हसवले जात होते, पण संवेदनशीलतेची सीमा ओलांडून कोणाचा तरी अपमान करणे, हा या परंपरेचा भाग कधीच नव्हता; परंतु आजची पद्धत पूर्णपणे बदलली असून समोर बसलेल्या प्रेक्षकांचा सार्वजनिक मंचावर तमाशा करणे, त्यांना हीन लेखणे आणि त्यांच्या अपमानातून हास्य निर्माण करणे हाच मोठा उद्योग झाला आहे. याचे दूरगामी परिणामही तितकेच घातक आहेत. आजच्या स्टँड-अप कॉमेडीच्या जगात क्राउड वर्क हा प्रकार कमालीचा लोकप्रिय ठरत आहे. मंचावरील कलाकाराने समोर बसलेल्या प्रेक्षकांशी थेट संवाद साधून, त्यांच्या उत्तरांमधून उत्स्फूर्तपणे विनोद निर्माण करणे म्हणजे क्राउड वर्क.

ही खरोखरच एक उत्तम कला आहे, ज्यासाठी कमालीची निरीक्षणशक्ती, चातुर्य, हजरजबाबीपणा आणि प्रसंगावधान आवश्यक असते; मात्र, आजकाल अनेक ठिकाणी या कलेचे रूपांतर एका विकृत प्रकारात होताना दिसत आहे. अनेक कार्यक्रमांमध्ये क्राउड वर्क म्हणजे प्रेक्षकांच्या वैयक्तिक, खासगी आयुष्याचा सार्वजनिक तमाशा बनवणे असाच प्रकार सुरू आहे. प्रेक्षकाने विश्वासाने सांगितलेल्या एखाद्या खासगी अनुभवाचा वापर करून, केवळ टाळ्या आणि शिट्ट्या मिळवण्यासाठी त्याला अधिकाधिक अश्लील, सनसनाटी आणि भडक स्वरूप दिले जाते. प्रणित मोरेच्या कार्यक्रमात हिमांशू या तरुणाच्या ₹बियार्णी₹ विनोदाने हाच बेशरमपणा चव्हाट्यावर आणला आहे. या सादरीकरणात केवळ अश्लील भाषेचा अतिरेक नव्हता, तर त्यात विकृत अभिमान दडला होता. एका स्त्रीसोबतच्या अत्यंत खासगी आणि वैयक्तिक अनुभवाचे ज्या हिणकस पद्धतीने सार्वजनिक प्रदर्शन करण्यात आले, ते अस्वस्थ करणारे आहे. या संपूर्ण प्रकारातून स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मान देण्याऐवजी, केवळ पुरुषी अहंकाराच्या प्रदर्शनासाठी वापरली जाणारी वस्तू म्हणून पाहण्याची पूर्वग्रहदूषित मानसिकता स्पष्टपणे दिसून येते. याहूनही गंभीर बाब म्हणजे, समोर बसलेले शेकडो प्रेक्षक या विकृत विनोदावर खदाखदा हसत होते, टाळ्या वाजवत होते आणि स्वतः कलाकार त्याला प्रोत्साहन देत होता. समस्या केवळ हिमांशू नावाच्या एका तरुणाच्या वक्तव्यात नाही; समस्या त्या सामूहिक मानसिकतेत आहे जी अशा विकृतीला विनोद समजून त्याचे कौतुक करते. याच सामाजिक मानसिकतेचे दुसरे टोक म्हणजे डॉ. सेजल पवार हिच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेला वाद. वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेताना वापरल्या जाणाऱ्या मृतदेहांबद्दल अत्यंत उथळ आणि असंवेदनशील भाषेत टिप्पणी केल्यामुळे समाजमनातून तीव्र संताप व्यक्त झाला. हा संताप पूर्णपणे स्वाभाविक आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी देहदान करणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय समाजावर फार मोठे उपकार करत असतात. आपल्या मृत्यूनंतरही आपल्या शरीराचा उपयोग भविष्यातील डॉक्टर घडवण्यासाठी व्हावा, हा त्यामागील उदात्त हेतू असतो. तो मृतदेह वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचा विषय असला, तरी ते शरीर मानवी सन्मानापासून मुक्त होत नाही. अशा देहांची टिंगलटवाळी करणे किंवा त्यांच्या अवयवांवर विनोद करणे हे अत्यंत वेदनादायी आहे. समाजाचा डॉक्टरवर एका देवासारखा विश्वास असतो. डॉक्टरकडून केवळ तांत्रिक ज्ञानाची किंवा कौशल्याची अपेक्षा नसते; तर माणसाविषयीची करुणा, आदर आणि सर्वोच्च संवेदनशीलतेची अपेक्षा असते. जेव्हा सोशल मीडियावर केवळ 'इन्फ्लुएन्सर' म्हणून प्रसिद्धी मिळवण्यासाठी, लाईक्स आणि व्ह्यूज मिळवण्यासाठी या विश्वासाचा आणि संवेदनशीलतेचा बळी दिला जातो, तेव्हा डॉक्टर-रुग्ण या पवित्र नात्यालाच तडा जातो. अर्थात, या प्रकरणावर टीका करताना काही नेटकऱ्यांनी संबंधित व्यक्तीच्या जातीवर, आरक्षण प्रक्रियेवर किंवा वैयक्तिक आयुष्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन भाष्य केले, तेही तितकेच निषेधार्ह आहे. टीका ही नेहमी विचारांवर आणि वर्तनावर असावी, व्यक्तीच्या जन्माधिष्ठित ओळखीवर किंवा जातीवर नव्हे; परंतु या संपूर्ण प्रकरणातून एक गोष्ट स्पष्ट होते की, आजच्या डिजिटल युगात लोकप्रियता मिळवण्यासाठी कोणतीही सीमा ओलांडण्याची एक जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे.

केवळ शारीरिक ठेवणीवरून किंवा अवयवांवरून थट्टा करणे किंवा खासगी बेडरूममधील अनुभवांचे भडक वर्णन करणे याला विनोद म्हणता येत नाही. तो केवळ प्रेक्षकांच्या सुप्त भावनांना उत्तेजित करण्याचा एक स्वस्त प्रयत्न असतो. आजचे अनेक तथाकथित विनोदवीर साहित्याचा, संस्कृतीचा आणि भाषेचा कोणताही गाढा अभ्यास नसल्यामुळे थेट मानवी शरीराकडे आणि लैंगिक अश्लीलतेकडे धाव घेतात, कारण तो विनोदनिर्मितीचा सर्वात सोपा मार्ग वाटतो. या संपूर्ण सांस्कृतिक अधःपतनामागे एक अत्यंत महत्त्वाचे कारण दडलेले आहे, ते म्हणजे आपली हरवलेली वाचनसंस्कृती. ज्या पिढीने पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे, द. मा. मिरासदार यांचे साहित्य कधी वाचलेच नाही, त्या पिढीला भाषेतील चमत्कृती, सूक्ष्म उपरोध आणि शाब्दिक कोटी यांमधील सौंदर्य कधी समजणारच नाही. आजचे मनोरंजन हे केवळ ३० सेकंदांच्या किंवा १ मिनिटाच्या रील्स आणि शॉर्ट्समध्ये मावले आहे. माणसाकडे विचार करण्यासाठी वेळ नाही, संदर्भ समजून घेण्याची सवय उरलेली नाही.

यामुळे थेट भडक आणि शरीरकेंद्री विनोद लगेच लोकप्रिय होतात. ज्या समाजात वाचन कमी होते, तिथे भाषेची समृद्धी आणि खोली नष्ट होते. भाषेची समृद्धी संपली की आपोआपच विनोदाचा स्तर खालावत जातो. या संपूर्ण प्रक्रियेत आपण केवळ कलाकारांना दोष देऊन चालणार नाही. यामध्ये प्रेक्षकांची जबाबदारी तितकीच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाची आहे. प्रणित मोरे, हिमांशू किंवा सेजल पवार यांच्याभोवती निर्माण झालेले वाद हे बौद्धिक दिवाळखोरीचे जिवंत पुरावे आहेत. विनोद आणि विकृती यांमधील सीमारेषा आता पूर्णपणे धूसर झाली आहे. लोकप्रियतेच्या आणि पैशाच्या हव्यासापोटी काहीही बोलण्याची वृत्ती बळावत चालली आहे. विनोद हा माणसाला अधिक माणूस बनवणारा, त्याचे दुःख हलके करणारा आणि त्याला स्वतःच्या चुकांवर हसायला शिकवणारा असायला हवा. तो कोणाचा तरी सार्वजनिक अपमान करून, स्त्रीचा सन्मान धुळीस मिळवून किंवा मृतदेहांची थट्टा करून निर्माण होऊ शकत नाही.

एका अधुऱ्या कायद्यामुळे नराधमांना 'शक्ती'



महाराष्ट्रात दर ५३ मिनिटांनी एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव आहे. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे, तर अधुऱ्या शक्ती कायद्यामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही. पुण्याच्या नसरापूरमध्ये साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार होऊन तिची हत्या झाली. तिच्यानंतर पर्वतीत नऊ वर्षांच्या मुलीवर आजोबाने हात टाकला. चाकणमध्येही पुन्हा तशीच घटना. हे महाराष्ट्र दिनाच्याच आठवड्यातले चित्र आहे. पण या चित्राच्या पार्श्वभूमीत एक काळोखा कोपरा आहे, जिथे राजकारण चालू आहे. थंड, निगरगट्ट, स्वार्थी राजकारण. शक्ती कायदा राजकारणात अडकला. २०२१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेने शक्ती कायदा एकमताने मंजूर केला. बलात्कार, बालकांवरील अत्याचार, ॲसिड हल्ले यांसाठी २१ दिवसांत चौकशी, खटला आणि शिक्षा हा कायद्याचा गाभा होता. आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर बनवलेला हा कायदा देशातील सर्वाधिक कठोर ठरला असता. मग हा कायदा कुठे आहे आज? केंद्र सरकारच्या धूळखात पडलेल्या फाइलींमध्ये. तीन वर्षांहून अधिक काळ. फौजदारी कायदा हा समवर्ती सूचीत येतो. त्यामुळे राज्याने पारित केलेल्या अशा कायद्यांना केंद्राची अंतिम मंजुरी लागते हे घटनात्मक सत्य आहे. पण घटनेने ही प्रक्रिया अडवण्यासाठी दिलेली नाही, ती समन्वयासाठी दिली आहे. केंद्राने शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? एकही तांत्रिक उत्तर आजपर्यंत दिले गेले नाही. कारण अडथळा तांत्रिक नव्हता. जो अडथळा होता तो राजकीय होता. महाविकास आघाडी सरकारने बनवलेला कायदा केंद्रातील भाजपने मंजूर करायचा हे त्यांना रुचले नाही. एखाद्या विरोधी सरकारच्या यशाला मुद्रांकन द्यायचे नाही, हा पक्षाचा अलिखित नियम. या नियमाची किंमत नसरापूरच्या त्या चिमुरडीने जीव देऊन चुकवली. हे आकलन कठोर वाटते का? तर विचार करा, आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायदा केंद्राने किती वेळात मंजूर केला होता? त्या राज्यात भाजपशी मैत्रीपूर्ण सरकार होते. महाराष्ट्रात शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी असलेले सरकार होते. हा योगायोग नाही. हे राजकीय गणित आहे. हे गणित सुटले तेव्हा काय झाले? महाराष्ट्रात सत्तांतर झाले, महाविकास आघाडी गेली, महायुतीचे सरकार आले आणि भाजपचा मुख्यमंत्री आला. आता शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? उत्तर शून्य असायला हवे होते. पण तरीही कायदा लटकतच राहिला. तेव्हा बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाला, राज्य पेटले, पुन्हा आश्वासने दिली. मग २०२५ मध्ये एक नवे 'सुधारित शक्ती विधेयक' आले. भारतीय न्याय संहितेत फेरफार करत. हे विधेयक म्हणजे काय होते? मूळ शक्ती कायद्याची सावली. त्यातील दोन तरतुदी डिजिटल छळाविरोधात आणि ॲसिड हल्ला पीडितेच्या गोपनीयतेसाठी इतक्याच घेतल्या. बाकी कठोर तरतुदी, २१ दिवसांची वेळमयार्दा, जलदगती यंत्रणा हे सगळे भारतीय न्याय संहितेमध्ये आधीच आहे असे सांगून सोडण्यात आले. पण जर भारतीय न्याय संहितेत पुरेशा तरतुदी आहेत, तर नसरापूरमध्ये न्याय का मिळत नाही? जर फास्ट ट्रॅक कोर्ट आहे, तर पुणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहा हजारांहून अधिक पोक्सो प्रकरणे प्रलंबित का होती? उत्तर साधे आहे.

कायदा असणे आणि कायदा चालवणे यात फरक आहे. हा फरक दूर करण्याची इच्छाशक्ती या सरकारकडे नाही. नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वी दोनदा तत्सम गुन्ह्यांत अटक झालेला होता. दोन्ही वेळा पुराव्याअभावी सुटला. या माणसाला तिसऱ्यांदा संधी मिळाली ती कशामुळे? तपासाच्या सुमार दर्जामुळे, न्यायालयीन विलंबामुळे आणि पीडितांना वेळेत न्याय न मिळाल्यामुळे. हे तिन्ही प्रश्न शक्ती कायद्याच्या तरतुदींनी सोडवले असते. आता सत्ताधारी म्हणतील की, भारतीय न्यायसंहितेमध्ये तरतुदी आहेत, पोक्सो आहे, एसआयटी स्थापन केली आहे. पण हे सगळे घटना घडल्यानंतर. प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे? पूर्वसावधगिरी कुठे आहे? सत्य हे आहे की, या सरकारला घटनेनंतर उद्रेक आवरण्यात रस आहे, प्रश्न सोडवण्यात नाही. एसआयटी हे संताप झाकणारे झाकण आहे, उपाय नाही. जमाव रस्त्यावर उतरतो, पोलीस स्टेशनसमोर जमतो, आरोपीला आमच्या स्वाधीन करा असे ओरडतो. हे दृश्य लोकशाहीसाठी धोकादायक आहे. या धोक्याचे मूळ कारण जनतेत नाही. जेव्हा व्यवस्था न्याय देत नाही, तेव्हा माणूस न्याय विकत घेण्याचा किंवा स्वतः करण्याचा प्रयत्न करतो. हा समाजशास्त्राचा नियम आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना जबाबदार धरायचे असेल तर ते शक्ती कायदा अडवणाऱ्यांना धरावे लागेल. आजपर्यंत महाराष्ट्रात एक जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या सोळा महिन्यांत ९३ हजार ३९० पोक्सो गुन्हे दाखल झाले. दर ५३ मिनिटांनी एक अत्याचार होतो. ही आकडेवारी पाहून केवळ गुन्हेगारांना दोष देता येणार नाही. ही आकडेवारी जी व्यवस्था कायदे बनवते, ते अडवते, त्यांची अंमलबजावणी करत नाही आणि प्रत्येक घटनेनंतर केवळ निषेधाचे नाटक करते त्यांनाही दोषी धरते. नसरापूरची चिमुरडी गेली. तिला परत आणणे कोणाला शक्य नाही. पण पुढची नसरापूर टाळणे शक्य आहे. जर इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे. अन्यथा बालकांच्या जीवाचे रक्षण करण्याऐवजी सरकार राजकीय श्रेयाच्या लढाईत मग्न राहिले, तर त्याची इतिहासात नोंद होईल. एसआयटी स्थापन होते, निषेध होतो, आश्वासने दिली जातात, पण दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव बदलत नाही. शक्ती कायद्याचे उदाहरण सांगते की, महाराष्ट्रात राजकीय इच्छाशक्ती असेल तर कायदे बनतात, पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांना राजकारणाची चाळणी लागते. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे तर एका अधुऱ्या कायद्यामुळे, एका प्रलंबित न्यायामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२३ जुन २०२६ ते २९ जुन २०२६

मिरा -भाईंदर पोलिसांचा उत्तर प्रदेशातील एमडी ड्रग्ज कारखान्यावर छापा

भाईंदर : मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे प्रकटीकरण कक्ष - ४ च्या पोलिसांनी उत्तर प्रदेश राज्यात ड्रग्ज माफियांविरोधात कारवाई केली आहे. उत्तरप्रदेश राज्यातील हरदोईमधील संण्डीला पोलीस ठाणे हद्दीतून आरोपीकडून १ किलो २६ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ तसेच एम.डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारे एम. एम.ए.चे एकूण ३०० लिटर रसायन व एम.डी. ड्रग्ज बनविण्याचे लॅब साहित्य त्यात हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, एडीशन पॉट, बुकनर फनेल असा एकूण २ कोटी ७ लाखांचा रुपये किंमतीचा



मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी उत्तरप्रदेश आणि तेलंगणा राज्यात जाऊन एमडी ड्रग्ज तयार करणारे कारखाने उध्वस्त करत आतापर्यंत २० आरोपींना अटक करीत एकूण २२ कोटी ७९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्या मुद्देमालात ३०० लिटर ड्रग्ज बनविण्यासाठी लागणारे रसायन व २ किलो ३०० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली आहे. मिरा भाईंदर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा - ४ च्या पोलिसांनी ४ एप्रिल रोजी मिरा रोडमध्ये राहणाऱ्या महिला फिरदोस कुरेशी यांच्या घरातून १ किलो ३२४ ग्रॅम वजनाचे २ कोटी ६६ लाख ७७ हजार २८० रुपये किमतीचा एमडी ड्रग्स हा अंमली पदार्थ जप्त करत गुन्हा दाखल केला होता. त्यात पोलिसांनी त्या आरोपी महिला व तिचा पती अरबाज कुरेशी यांच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यात पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तपास करत एकूण १८ आरोपींना अटक केली होती. त्यात मुंबईतील आगरीपाडा, मालवणी, मनोरी व तेलंगणा राज्यातील जहीराबाद परिसरातून एमडी ड्रग्ज तयार करण्यासाठी उभारलेली ड्रग्स फॅक्टरी व त्यासाठी लागणारे केमिकल व लॅबचे साहित्य असा २० कोटी ७२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. त्यानंतर सदरील गुन्हयातील आरोपी क्रमांक १९ तसलीम आरिफ छुटटन ऊर्फ रज्जाक याला १६ जून रोजी उत्तरप्रदेश राज्यातील हरदोई मधील संण्डीला पोलीस ठाणे हद्दीतून अटक करुन आरोपीकडून १ किलो २६ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ तसेच एम. डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारे एम.एम.ए.चे एकूण ३०० लिटर रसायन व एम. डी. ड्रग्ज बनविण्याचे लॅब साहित्य त्यात हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, एडीशन पॉट, बुकनर फनेल असा एकूण २ कोटी ७ लाखांचा रुपये किंमतीचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे.

मोबाईल कॅमेऱ्याच्या झूममुळे उलगडलं रहस्य

विरारच्या डोंगरात झाडाला लटकलेला तरुणाचा मृतदेह आढळला



विरार। विरार तालुक्यातील मांडवी परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. काशीद कोपर येथील कुलस्वाई माता मंदिराजवळील डोंगराळ भागात एका ३४ वर्षीय तरुणाचा झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. विशेष म्हणजे, मंदिर परिसरात फोटोशूट करत असलेल्या एका तरुणाने फोटोला झूम केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आणला. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दक्ष पाटील हा तरुण कुलस्वाई माता मंदिर परिसरात छायाचित्रण करत होता. यावेळी त्याने डोंगराळ भागाकडे मोबाईलचा कॅमेरा झूम करून पाहिले असता एका झाडाला व्यक्ती लटकलेल्या अवस्थेत दिसून आली. हा प्रकार लक्षात येताच त्याने तात्काळ मांडवी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी केली असता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी तपास करण्यात आला असता त्याच्याकडील आधार कार्डावरून त्याचे नाव लालमोहन पारस चौहान (वय 34) असे असल्याचे समोर आले. तो मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. प्राथमिक तपासात हा प्रकार आत्महत्येचा असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी मांडवी पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, दुर्गम डोंगराळ भागात हा मृतदेह होता. त्यामुळे मोबाईल कॅमेऱ्याचा झूम वापरून हा प्रकार निदर्शनास आला नसता, तर मृतदेह अनेक दिवस तिथेच राहिला असता, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

तक्रारदारच निघाली आरोपी, जबरी चोरीचा बनाव उघड

भाईंदर : मिरारोड येथील एका कार्यालयात चाकूचा धाक दाखवून २ लाख ९४ हजार रुपयांची जबरी चोरी झाल्याचा खोटा बनाव रचर्णाया तिघांना नयानगर पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील फियार्दी महिलेनेच आपल्या दोन मित्रांच्या मदतीने चोरीचा कट रचल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी गुन्ह्यातील संपूर्ण २ लाख ९४ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करून ती मूळ मालकाच्या स्वाधीन केली आहे. नयानगर परिसरातील शांती शॉपिंग सेंटर येथे असलेल्या फायव्हेज टेक इंटरनॅशनल कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या २६ वर्षीय उजमा रियाज खान यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, १८ मार्च रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्या कार्यालयात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी आत प्रवेश केला. त्यांनी कार्यालयाचे शटर बंद करून उजमा खान यांना चाकूचा धाक दाखवला आणि टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली २ लाख ९४ हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने लंपास केली. या तक्रारीच्या आधारे नयानगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासा दरम्यान पोलिसांनी संशयित मुजम्मिल अब्दुल हफिज सिद्दीकी (वय २० वर्ष)याला २० मार्च रोजी ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल चौकशी केल्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. तपासात असे निष्पन्न झाले की, फियार्दी उजमा रियाज खान हिनेच कार्यालयातील रोख रकमेची माहिती आपल्या मित्र मोहम्मद आवेश मोईद्दीन शेख आणि मुजम्मिल सिद्दीकी यांना दिली होती. तिघांनी संगनमताने चोरीचा खोटा बनाव रचून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून तिन्ही आरोपींना अटक केली. तसेच त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यातील संपूर्ण २ लाख ९४ हजार रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली.

गंधर्व विवाहाच्या बहाण्याने उच्चशिक्षित तरुणींवर लैंगिक अत्याचार, इंजिनिअर साधूला अटक

सातारा। उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गोवर्धन पोलीस ठाण्याच्या पथकाने धर्माच्या नावाखाली सुशिक्षित तरुणींचे ब्रेनवॉश करून त्यांचे लैंगिक शोषण करणाऱ्या एका भोंदू बाबाला अटक केली आहे. साधूचा वेश परिधान केलेल्या या आरोपीची ओळख अभिषेक मिश्रा उर्फ 'आदि कर्ता' अशी झाली असून तो मूळचा भुवनेश्वरचा रहिवासी आहे. विशेष म्हणजे आरोपी स्वतः एक मेकॅनिकल इंजिनिअर आहे. हा आरोपी गेल्या तीन वर्षांपासून गोवर्धन परिसरात वास्तव्य करून ऑनलाइन माध्यमातून सुशिक्षित तरुणींना आपल्या जाळ्यात ओढत होता. पोलिसांनी कारवाई करत या भोंदू बाबाच्या तावडीतून दोन तरुणी आणि एका तरुणाची सुटका केली आहे. तसेच त्याच्याकडून मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले असून पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत. गंधर्व विवाहाच्या नावाखाली शारीरिक संबंध अटक करण्यात आलेला आरोपी अभिषेक मिश्रा हा कोणताही अशिक्षित गुन्हेगार नसून तांत्रिकदृष्ट्या अत्यंत चतुर आहे. तो सोशल मीडिया आणि विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर भजन-कीर्तन मंडळी तयार करायचा. या माध्यमातून तो बी.टेक आणि एम.टेक झालेल्या उच्चशिक्षित तरुणींना लक्ष्य करत असे. तरुणींना करिअरचे उत्तम पॅकेज आणि आध्यात्मिक शांततेचे आमिष दाखवून तो गोवर्धन येथे बोलवून घ्यायचा. येथे आल्यानंतर तो या तरुणींचे मानसिकदृष्ट्या अशा प्रकारे ब्रेनवॉश करायचा की, त्या आपल्या घर-परिवाराला विसरून त्याच्या ग्रुपमध्ये सामील व्हायच्या. यानंतर हा भोंदू बाबा गंधर्व विवाहाच्या नावाखाली त्यांच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध



प्रस्थापित करून त्यांचे शोषण करायचा. आरोपीची रवानगी तुरुंगात गोवर्धनचे उपअधीक्षक अनिल कुमार यांनी सांगितले की, पीडितेच्या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचून आरोपी अभिषेक मिश्राला अटक केली. छापामारीच्या कारवाई दरम्यान पोलिसांनी बाबाच्या बेकायदेशीर ताब्यातून दोन तरुणी आणि एका तरुणाची सुखरूप सुटका केली असून, त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून त्यांना स्वाधीन केले आहे. आरोपीविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याची रवानगी तुरुंगात करण्यात येत आहे.

12 हून अधिक मुली फसल्या

पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने आतापर्यंत डझनभरहून अधिक महिला आणि तरुणींना आपल्या जाळ्यात ओढले आहे. अटक केल्यानंतर पोलिसांनी जेव्हा या भोंदू बाबाचा मोबाईल फोन तपासला, तेव्हा त्यातून 25 ते 30 अश्लील आणि आक्षेपार्ह फोटो जप्त करण्यात आले. पोलीस या फोटोंच्या आणि आरोपीच्या डिजिटल फूटप्रिंट्सच्या आधारे या घृणास्पद रॅकेटमध्ये इतर काही लोकांचाही समावेश आहे का, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामीण पोलीस अधीक्षक सुरेश चंद्र रावत यांनी सांगितले की, ओडिशातील एका पीडित तरुणीने या नरकातून सुटका करून घेत हिंमत दाखवली आणि आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात लेखी तक्रार नोंदवली, तेव्हा हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.

एक्स बॉयफ्रेंड भेटला अन्... वकील महिलेने 6 वर्षीय लेकीला संपवलं

मुंबई। एका आईने आपल्या पाच वर्षाच्या चिमुरड्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे आपल्या प्रियकरासोबत मिळून तिने ही हत्या केली. तीन महिन्यांपूर्वी झालेल्या या हत्येचा उलगडा मृत मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर झाला. वेन्नीला असं चिमुरडीचं नाव आहे. 24 मार्च रोजी तिचा मृत्यू झाला होता. तिचे वडील प्रवीण यांनी पोलिसांत धाव घेत आपली पत्नी प्रियांका आणि तिचा कथित प्रियकर मोहन यांच्यावर मुलीच्या हत्येचा संशय व्यक्त केला. कर्नाटकची राजधानी बेंगलोर येथील ही घटना आहे.

जुन्या मित्रासोबत लिव्ह-इनमध्ये

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण आणि प्रियांका यांचा 2007 मध्ये विवाह झाला होता. या दांपत्याला 17 आणि 5 वर्षाच्या दोन मुली आहेत. प्रियांका वकील आहे. प्रियांकाची काही वर्षांपूर्वी तिचा कॉलेजमधील प्रियकर मोहन याच्याशी पुन्हा भेट झाली आणि त्यांच्यात जवळीक वाढली. त्यानंतर ते एकत्र राहू लागले होते. या प्रेमसंबंधांमुळे पती-पत्नीत वाद निर्माण झाले होते आणि प्रियांकाने प्रवीण यांच्याकडे घटस्फोटाची मागणीही केली होती. मोहनसोबत लिव्ह-इनमध्ये राहू लागल्यानंतर प्रियांका आपल्या लहान मुलीला सोबत घेऊन जात असे.



मृत्यूच्या वेगवेगळ्या कारणांमुळे संशय


24 मार्च रोजी झालेल्या चिमुरडीच्या अचानक मृत्यूबाबत विचारले असता, प्रियांकाने कुटुंबीयांना वेगवेगळ्या आणि संशयास्पद कहाण्या सांगितल्या. एका प्रसंगी तिने मुलीला बियार्णी खायला घातल्याचे सांगितले, तर दुसऱ्या वेळी तिने मुलीला आईस्क्रीम देऊन वातानुकूलित (अउ) कारमध्ये झोपायला ठेवल्याचा दावा केला. नंतर, दुसऱ्या दिवशी सकाळी घरी परतल्यावर मुलगी मृत अवस्थेत आढळल्याचे तिने सांगितले. प्रियांकाच्या या बदलत्या विधानांमुळे कुटुंबीयांचा संशय बळावला.

प्रियकर अटकेत, प्रियांका फरार

दरम्यान, वडील प्रवीण यांनी मुलीचा शवविच्छेदन अहवाल परदेशात डॉक्टर असलेल्या आपल्या एका नातेवाईकाला दाखवला. या अहवालाचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर, मुलीला मारहाण करून तिचा गळा आवळून खून करण्यात आल्याचा संशय बळावला. यानंतर प्रवीण यांनी पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी संशयित आरोपी मोहन याला अटक केली असून, मुख्य आरोपी प्रियांका सध्या फरार असून पोलीस तिचा शोध घेत आहेत. या प्रकरणाचा फॉरेन्सिक लॅबच्या अहवालाची प्रतीक्षा असून पुढील तपास सुरू आहे.

ऑफिसमध्येच मर्डर, सहकाऱ्याने क्रूरपणे संपवलं... निष्पाप तरुणीसोबत काय घडलं?

मुंबई। एका महिलेची तिच्याच एक्स बॉयफ्रेंडने कार्यालयात घुसून चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका खासगी पॅकर्स अँड मूवर्स कंपनीच्या कार्यालयात ही भीषण घटना घडली. डिंपल असे मृत महिलेचे नाव असून ती याच कंपनीत कार्यरत होती. या घटनेने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आला आहे. गुरुवारी सायंकाळी ऑफिसमध्ये काम सुरू असताना हरविंदर तिथे पोहोचला आणि त्यांच्यात वाद सुरू झाला. काही वेळातच या वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेल्या दृश्यांनुसार, आरोपीने आपल्यासोबत आणलेल्या चाकूने डिंपलवर ताबडतोब अनेक वार केले. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर तिथे एकच आरडाओरडा आणि घबराट पसरली. डिंपलवर प्राणघातक हल्ला केल्यानंतर आरोपी हरविंदरने स्वतःवरही त्याच चाकूने वार करून आपली जीवनयात्रा संपवण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि सहकाऱ्यांनी त्वरित पोलीस व रुग्णवाहिकेला पाचारण केले. गंभीर जखमी अवस्थेत दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचार सुरू असताना डॉक्टरांनी डिंपलला मृत घोषित केले. आरोपी हरविंदरची प्रकृती अजूनही नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून ते तपासासाठी महत्त्वाचा पुरावा मानले जात आहे. प्राथमिक तपासानुसार, हे प्रकरण जुन्या प्रेमसंबंधातून, ब्रेकअपच्या रागातून आणि एकतर्फी दबावातून घडल्याचे दिसून येत असून पोलीस अधिक तपास करत आहेत. पंजाबच्या मोहाली शहरातील सेक्टर-66 जवळ असलेल्या ऑफिसमध्ये ही घटना घडली. डिंपली ही मूळची पटियाला येथील रहिवासी होती.



ब्रेकअप झाल्यानंतर पॅचअपसाठी करत होता प्रयत्न

या प्रकरणात आरोपीचे नाव हरविंदर मान उर्फ हॅरी असे असून, तो डिंपलचा एक्स बॉयफ्रेंड आणि सहकारी देखील होता. डिंपल आणि हरविंदर गेल्या तीन वर्षांपासून एकाच कार्यालयात काम करत होते आणि पूर्वी ते एकमेकांच्या रिलेशनशिपमध्ये होते. मात्र, सुमारे सहा महिन्यांपूर्वी त्यांच्यातील हे नाते संपुष्टात आले होते. ब्रेकअप झाल्यानंतर डिंपलने हरविंदरपासून पूर्णपणे दुरावा ठेवला होता, परंतु हरविंदर मात्र सतत डिंपलवर पुन्हा रिलेशनशिपमध्ये येण्यासाठी दबाव टाकत होता आणि तिला मनवण्यासाठी प्रयत्न करत होता.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com